**<u>प्रेस नोट</u>**

**<u>परीमंडळ ३ पुणे शहर विभागातील, सिंहगड रोड पोलीस ठाण्याचे, हद्दीतील सराईत गुन्हेगारास पुणे शहर पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय तसेच पुणे जिल्हा परिक्षेत्रातून हद्दपार केलेबाबत</u>**

दिनांक ०५/०४/२०१९

कोथरूड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार इसम सुरेश कालीदास वाझे वय-२१ वर्षे, रा. राऊतवाडी, शंकर मंदिरा मागे, केळेवाडी, कोथरूड, पुणे यास मुंबई पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ ३, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक १४/२०१९ दिनांक ०५/०४/२०१९ रोजी (१) एक वर्षा करीता पुणे शहर पोलीस आयुक्तालय परिक्षेत्रातून हद्दपार करण्यात आले आहे. सदर इसम त्याच्या गुंड साथीदारांसह स्वतः जवळ घातक शस्त्र बाळगून खुनाचा प्रयत्न, दुखापत करणे, बेकायदेशीर अग्नीशस्त्र बाळगणे वगैरे गंभीर गुन्हे करत आहे. त्याचे विरुध्द सिंहगड रोड पोलीस ठाणेस वरील प्रमाणे गुन्हे दाखल असून त्याची सदर भागात दहशत असल्याने त्यास श्री. मंगेश शिंदे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, पुणे शहर यांनी पुणे शहर व पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय व पुणे जिल्हा कार्यक्षेत्रातून एक (१) वर्षा करीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

**( मंगेश शिंदे )**
पोलीस उप आयुक्त
परिमंडळ ३, पुणे शहर